दैनिक साम्ययोग-

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पं.

अंक : ९८ ) वर्धा, गुरुवार ता. ९ जुलई १९६४ ( मूल्य ५ न.पं

## धाम नदीच्या तीरावरून

लेखक- मधु रावकर



**विनोबा परंधामआश्रम शेतांत श्रमदान करीत असतांना**

दररोज तीन-चार तास विनोबांचा हा कार्यक्रम असतो.

अर्जुनाला गीता सांगून त्याचा भ्रम-निरास करणारा गीता-माऊलीचा वक्ता त्या अर्जुनाचे सारथ्य करीत असला तरी त्या सारथ्य करण्याच्या कामांत तो जसा रंगतो. तसाच तो भगवान् उष्टि काढण्याच्या कामांत रमतो. कर्मयोग्याची ही जी भूमिका आहे ती अपवित्र कामाला पवित्र बनवीत असते. जे पवित्र आहे, तेच परब्रह्म आहे. म्हणून कर्मयोगी हा उष्टि काढण्याच्या कामांत रमतांना दिसला, संडास सफाईच्या कामांत दंग दिसला तरी त्यापेक्षाहि तो वेगळा असतो. तो असतो पावित्र्यांत रमलेला आणि परब्रह्मांत दंगलेला! भगवान कृष्णाची ती उष्टि काढणें, महंमद पैगंबराच्या मेंढ्या हाकणें, कबिराचे विणणें, महात्माजींचे भंगी काम ही कामे म्हणजे त्या थोरांची चाललेली या कामामार्फत प्रभूची पूजाच होय.

### आपल्या आंत सारी दुनिया

आज आम्ही ब्रह्मविद्यामंदिरांत परंधाम नदीच्या तीरावर आहोत. इथेच पू. विनोबाजींनीं एकांत साधना केली. आणि त्या साधनेंतून धाम नदीच्या तीरावर 'धाम' प्रकाशले--

'इथे मराठाचिये नगरी
ब्रह्मविद्येचा सुकाळ करी'

ज्ञानदेवांनीं असा ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. आणि या दुष्काळाच्या काळांत ही ब्रह्मविद्या विनोबाजींनीं भारतभर भ्रमण करून गांवोगांवच्या लोकांना वाटली. आणि गंमत अशी कीं वाटूनहि ही संपत्ति संपली नाही. उलट वाढली. आणि संपायची बात नको--


'उद्धरावा स्वये आत्मा
खचू देवो नये कधीं
आत्माचि आपला बंधू
आत्माचि रिपु आपुला'

आपले शत्रू आपणच आहोत आणि आपले मित्र आपणच आहोत. म्हणून जो स्वतःशी मैत्री साधील तो साऱ्या दुनियेला आपल्या आंत सामावून घेऊं शकतो. हे जे 'मित्रश्च चक्षु' आहेत त्याचे जीवनांत फार महत्व आहे. संतांचा अनुभव आहे—

चित्त शुद्ध तरी शत्रु-मित्र होती

ज्याचे चित्त शुद्ध झाले तो आपल्यामध्ये विश्वाला आणि विश्वात्म्याला पाहून त्याची पूजा करीत असतो.

## भारताची अन्न समस्या सोडविण्याबाबत काही सूचना



जो देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण नसेल त्या देशाचे संरक्षण विषयक धोरणच सपशेल चुकले आहे असे हमखास समजावे. आणि भारतासारख्या, अनुकूल हवामान असलेल्या, भरपूर सुपीक जमीन असलेल्या शेतकीप्रधान देशाला तर ही अत्यंत नामुष्कीची गोष्ट आहे.

जामनी येथील मुक्कामात विनोबांनी शास्त्रीजी सोबत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नावर चर्चा केली. अन्न समस्येवरहि विचार झाला. अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी शास्त्रीजींना ज्या काही उपयुक्त सूचना केल्या त्यापैकी काहींचा उल्लेख विनोबांनी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांशी केलेल्या चर्चेच्या वेळी केला आहे. आज आपणा समोर अन्नसमस्येने गंभीर रूप धारण केले आहे. तो प्रश्न सोडविण्यासाठी विनोबा सुचवितात:-

१) देश अन्न धान्याचा बाबतीत स्वावलंबी करू असा सरकारने संकल्प करावा.

२) भूमिहीनांना शेतीत काम करण्यास उत्साह वाटावा म्हणून त्यांना प्रेमाने भूदान द्यावे.

३) गावातील लोकांनी वर्षभर पुरेल एवढे धान्य गावात ठेवावे.

४) शेत मजुरांना व सरकारी कर्मचाऱ्यांना वेतनाचा अेक ठराविक हिस्सा धान्यांत द्यावा.

५) सरकारने शेतसारा धान्यात गोळा करून जागोजागी धान्य संग्रह करून तो अन्य लोकांना योग्य किंमतीत द्यावा.

त्याशिवाय वेळोवेळी विनोबांनी खालील विचार मांडले आहेत. भारताच्या प्रत्येक नागरिकाने- चपराशा पासून तर राष्ट्रपतीने- धर्मकृत्य समजून दररोज अेक दोन तास शेतीत काम करावे.

चहा, ज्यूट, तंबाखू ह्या पिकांना उत्तेजन न देता धान्य उत्पादनावर भर द्यावा. 'दोन वर्षांत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी करु' ह्या स्व. पंडितजींच्या घोषणेचे विनोबांनी १९५१ साली मनापासून स्वागत केले होते. परंतु जेव्हा तो संकल्प पूर्ण झाला नाही तेव्हा स्व. पंडित जवाहरलाल नेहरुजीबद्दल आत्यंतिक श्रद्धा व जिव्हाळा बाळगणारे विनोबा म्हणाले होते:-

'रघुकुल रीति सदा चली आयीं
प्राणजाइ बरु बचन न जाई"

ज्या सरकारने येवढा गंभीर निश्चय तोडला त्याबद्दल त्यानी सरकार सोडून बाहेर पडावे. ह्यावरून कळून येईल की विनोबा १९५१ सालापासून अन्न समस्येबाबत किती जागरूक आहेत आणि किती विधायक सूचना त्यांनी ह्याबाबत समाजासमोर मांडल्या आहेत.

—वसंत बोंबटकर

--०--

### आम्ही हाय हाय !

विनोबाजींची सेवारूप साधना आमच्या नजरेसमोर आहे. ती सारी पाहत असतांना आज आम्ही इथें पाहतो विनोबा शेतांत काम करीत आहेत. गीता सांगते-

'शरीर आहे शेत आणि आत्मा आहे शेतकरी' तपश्चर्येनें शेत नांगरावयाचे. त्यातली तणे उपटून काढावयाची. आणि मग कसें जीवन बनते ते पाहतांना विनोबाजी आमच्या डोळयासमोरून हालत नाहींत. हृदयाला चक्षु फुटल्यासारखे वाटते आणि 'हाय हाय' आम्ही किती मागासले आहोत ही जाणीव होते.

परंतु ह्या जाणीवेंतून जीवन बनेल असा विश्वासाचा निश्वास सुटतो. आणि धाम नदीच्या तीरावरून आमच्या जीवनाला, समाजपुरुषाला मांगल्याची प्रेरणा मिळत आहे. त्या विचारांतून जीवन बनेल. असा हा जीवन-विचार आहे.

--०--

# ग्रामदानानंतरची कल्पना व योजना

**प्रा. राममूर्ति**

आता असे दिसून येत आहे की ग्रामदान प्राप्तीचे काम तितकेसे कठीण नाही. पण त्यानंतरचे निर्माणाचे कार्य त्याहून खडतर आहे. प्रत्येक ग्रामदान म्हणजे अेक मोठी जबाबदारीच ठरते. माझ्या कल्पनेप्रमाणे निर्माण कामात जे काही प्रश्न उभे झाले आहेत त्यांची खालीलप्रमाणे नोंद करता येईल–

१) निर्माण कार्याची दिशा–आर्थिक विकास व चित्त निर्माणाची संमिलित प्रक्रिया.

२) ग्रामदानी गावांचे संघटण आणि त्यांच्या निर्मितीसाठी त्यांच्यात क्षमता निर्माणाचे कार्य.

३) निर्माण कार्यात संस्थांचे व कार्यकर्त्यांचे स्थान–उपयोग व त्यांची त्यासाठी तयारी.

४) सरकारचे स्थान

५) ग्रामदानी गावांची क्रांतिकारकता

निर्माण कामाची दिशा कशी रहावी हा निर्माणाबाबत सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. परंतु अभावग्रस्त भागात सहाजिकच प्रथम लक्ष आर्थिक विकासाकडेच जाते. आणि ते गेलेहि पाहिजे. आतापर्यंत सरकारी किंवा गैरसरकारी स्तरावरून आर्थिक विकासाचे जे काही प्रयत्न झाले आहेत त्यातून असेच दृष्टोत्पत्तीस आले आहे की जसजसा आर्थिक लाभ होऊ लागतो तसतशी लोभाची मात्राहि पण त्यासोबत वाढत जाते आणि आपल्यापोळीवर तूप ओढण्यासाठी आपसात झटापटी सुरू होतात. आणि अनेक तऱ्हेच्या भ्रष्टाचाराला ऊत येतो. तेव्हा ही परिस्थिति टाळण्यासाठी म्हणजे जेणेकरून चित्त व बुद्धीच्या विकासावरच लक्ष केंद्रित राहील आणि त्यातूनच मग आर्थिक विकास आपेआप प्रगट होईल अशी अेखादी शैक्षणिक योजना बनविता येणार नाही का ?

आर्थिक विकासाकरिता पुढील दोन गोष्टी तात्काल डोळ्यासमोर येतात. अेकतर लोकांची कमाईच अल्प आहे. आणि ते जी काही कमाई करतात ती सुद्धा त्यांच्या हातात राहत नाही. तेव्हा कमाई कमविणाराच्या हातातच ती राहील अशी व्यवस्था करणे आणि कमाईचे प्रमाण वाढविणे हे दोन इलाज करावे लागतील. शेतीला पूरक धंदा म्हणून ताबडतोब उपलब्ध होणारा चरख्याशिवाय दुसरा उद्योग दिसत नाही. तेव्हा उत्पादन वाढीसंबंधी विचार करतांना प्रथम चरणात पुढील गोष्टी सुचतात. (क) चांगल्या जातीच्या बियाण्यांचा पुरवठा, (ख) आपसात श्रम सहकार (ग) चरखा (घ) कर्ज मिळण्याची सोय.

ग्रामदानी गावांची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांना उत्तम बीयासाठी कर्जाऊ पैसे द्यावे आणि ग्रामसभेमार्फत प्रत्येकाला बीयाणे देऊन पीक आल्यानंतर सवाईने धान्याच्या रूपात किंवा पैशात वापस घ्यावे. चरख्यांची जबाबदारी जिल्हा संस्थांनी घ्यावी. चरख्यापैकी अंबर चरख्याकडे सर्वजण आकर्षित होतात. परंतु आवश्यक सामग्री आणि त्यासोबत मार्गदर्शनाची योग्य व्यवस्था असल्याशिवाय अंबरचरख्याला उत्तेजन देऊ नये.

अंबरचे उत्तम शिक्षक मिळणे कठीण गोष्ट आहे. तेव्हा स्थानीय लोकातूनच होतकरू लोकांना निवडून त्यांचे अेक परिश्रमालय चालवून त्यांना प्रशिक्षण द्यावे. आणि त्या लोकावर विचारांचा संस्कारहि करण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक शिक्षकाला कापूस उत्पादन, कताई आणि सरंजाम दुरुस्तीपर्यंतच्या सर्व क्रिया अवगत असाव्या. संस्थेचा वैतनिक कार्यकर्ता तो बनता कामा नये. त्याने जितक्या लोकांना शिकविले त्यांची परीक्षा घेऊन त्या विद्यार्थ्यांच्या फी ची रक्कम ग्रामसभेला द्यावी. कताईपासून अधिक उत्पादन होण्यासाठी अंबरचरख्यावर सूत कातणारांना तयार टेप देण्याची व साध्या चरख्यावर कातणारांना पेळू मिळण्याची व्यवस्था असावी. ह्याच आधारावर स्थानिक विणकरसुद्धा तयार करावे.

कर्जाचा प्रश्न हा फार गुंतागुंतीचा आहे. पण त्याला हात घातल्याशिवाय ग्रामदानाचा पाया मजबूत होणार नाही. सरकारने स्वस्त दराने कर्जाचा पुरवठा करावा परंतु स्थानिक सावकारावर बहिष्कार टाकू नये. ग्रामदान प्राप्ति बरोबरच कर्जाचे स्रोत आटायला लागतात; कारण सावकारांच्या मनात भीति निर्माण होत असते. सावकारांच्या मनातील ही भीति काढली पाहिजे आणि वाजवी दराने आणि योग्य तो नफा आकारून त्यांना भांडवल गुंतवून, आपला धंदा पुढेहि चालविता येईल अशी त्यांची खातर जमा करून दिली पाहिजे. त्यांना हे आश्वासन लाभले तर ग्रामदानाच्या मार्गातील अेक मोठा अडथळा दूर होईल.

आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांचाहि अनुक्रम लावणे आवश्यक आहे. आमच्या कल्पनेप्रमाणे हा क्रम पुढीलप्रमाणे असू शकतो––

१. आज ज्याला जे भोजन मिळत असेल ते वर्षातून बाराहि महिने-तीस दिवस दोन्ही वेळेला मिळावे.

२. अन्न-वस्त्रासाठी कर्ज काढण्याचा प्रसंग येऊ नये.

३. कमाई, खर्चापेक्षा थोडी अधिकच व्हावी; त्यामुळे त्याला हे भांडवल किफायतशीरपणे गुंतविता येईल.

४. चांगले भोजन, पुरेसा कपडा आणि श्रमशक्ति टिकून रहावी व ती अधिक कार्यक्षम बनावी अशी योजना व्हावयास पाहिजे.

कार्यक्रमासोबतच तीन गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.

१. उत्पादन मुख्यतः उपभोगासाठी असावे, आणि पैशांची आवश्यकता भासली तर शिल्लक असलेली सामुग्री किंवा सूत विकून त्याची पूर्ति करावी.

२. व्यवस्थेच्या नांवावर गावांतील कोणत्याहि व्यक्तीला श्रमापासून दूर राहण्याची संधि सापडू नये. कारण पुढे हीच बाब गावाचे अैक्य तोडण्यास कारणीभूत ठरू शकेल.

३. बाहेरून पैसा ओतून गावात कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्याच्या मोहापासून दूर राहिले पाहिजे. कल्याणकारी साधने मुख्यतः ग्रामस्थांच्या कमाईतूनच खरेदी करावी.

निर्माणासाठी मूलभूत भांडवल व सहकारशक्ति गावातूनच प्रगट व्हावयास पाहिजे. ग्रामदानी गावात ही पुंजी धान्य उत्पादन व वस्त्रोद्योगातून उभी होईल. श्रमदान हे भांडवल निर्मितीचे अेक फार मोठे साधन आहे. गावातून आलेल्या भांडवलाच्या प्रमाणातच सरकारी मदत मिळावी. आणि व्यक्तिगत भांडवल वापरायला देणारालाहि त्याच्या सुरक्षिततेची कायदेशीर हमी मिळेल अशी व्यवस्था व्हावयास हवी.

राज्य पातळीवर अेखाद्या कार्पोरेशनची स्थापना करून, त्या संस्थेने आर्थिक विकासाचे क्षेत्रात पाऊल टाकून गावांना आवश्यक ती साधने, तांत्रिक ज्ञान व भांडवल आदि पुरवावे. अशा तऱ्हेची व्यवस्था करता येईल कां ह्या बाबतहि विचार करायला हवा.

गावाची सहकार शक्ति वाढीला लागणे आणि गावाचे सामुहिक चित्त बनणे ह्या दोन गोष्टींचा ग्रामसंघटनेशी फार निकटचा संबंध आहे. आमची अशी कल्पना आहे की ग्रामदानी गावासाठी जशी कायद्याने अधिकार प्राप्त झालेली ग्रामसभा बनेल, त्याचप्रमाणे वरची साखळी जोडण्यासाठी खंड स्तरावर पंचायत समिति व जिल्हा पातळीवर ग्रामदान संघ बनेल. जिल्हा पातळीवर जिल्हा ग्रामदान संघ बनेल आणि त्याच धर्तीवर प्रादेशिक संघ व अखिल भारत संघ बनविता येईल. ग्रामसभा, पंचायतसभा व ब्लॉकच्या ग्रामदान संघाच्या आधारावर आमची शैक्षणिक प्रवृत्ति संघटित होईल. ग्रामसभेच्या स्तरावर मूलोद्योग शाळा, आणि ग्रामदान संघात विश्वविद्यालय राहील. ज्या दिवशी कार्यक्षम असा ग्रामदानी संघ संघटित होईल, आणि त्याला सव कायदेशीर हक्क प्राप्त होतील त्यावेळेला विकास व आंतरिक व्यवस्थेचे अधिकार क्रमशः मिळण्याबाबत पण मागणी करता येईल. आणि ह्या ग्रामदानी संघाच्या देखरेखीखाली पंचायती आणि ग्रामसभांना आपआपल्या क्षेत्रात ते सर्व अधिकार प्राप्त होतील. आणि त्या दिवसापासून दंडशक्तिचा अस्त होण्याला धीरे धीरे शुभारंभ होईल.

ग्रामसभा ही सर्वात मूलभूत स्वरूपाचा घटक आहे. विकास आणि व्यवस्था कार्याची ती मूलशक्ति व मुख्य श्रोत आहे. म्हणून ग्रामसभेकडे अधिकाधिक लक्ष पुरवायला हवे. प्रत्येक घरातील सर्व प्रौढ व्यक्ति किंवा प्रत्येक घरातून एक प्रतिनिधी घेऊन त्यांची ग्रामसभा बनेल.

( क्रमशः )

---०---

संपादक :-श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:- श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:- गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:-महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक ता. ९-६-६४ अं.९८र.नं.ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य )
श्री. ________